# रोजगार हमी योजना समितीची माहिती

भारतीय संविधानाच्या भाग ४ मध्ये राज्य संस्थेने राज्य कारभार करताना अंगिकारावयाची मार्गदर्शक तत्वे नमूद केली आहेत. त्यातील अनुच्छेद ४१ अन्वये राज्य संस्थेने प्रत्येक नागरिकाला निर्वाहाचे साधन अथवा रोजगार मिळविण्याचा हक्क प्राप्त करुन देण्याबद्दल प्रयत्नशील रहावे असे सांगण्यात आले आहे. संविधानात नमूद केलेल्या या तत्वानुसार महाराष्ट्र शासनाने सन १९७२ मध्ये "१५ कलमी कार्यक्रम" तयार केला होता. त्यामध्ये रोजगार हमी योजनेचाही समावेश होता.

अंगमेहनतीचे काम करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला काम मिळवून देऊन स्वाभीमानाने जीवन जगण्यासारखी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. ही राज्य शासनाची रोजगार हमी योजना सुरु करण्यामागील भूमिका आहे. महाराष्ट्रातील शेतमजूरांना शेतीच्या हंगामात वर्षभरात सरासरीचे चार ते साडेचार महिने काम मिळते. शेतीचा हंगाम नसतो तेव्हा कामाअभावी त्यांची श्रमशक्ती वाया जात असते आणि काम नसते म्हणून त्यांना उपाशीपोटी रहावे लागते. वाया जाणाऱ्या श्रमशक्तीचा उपयोग करुन उत्पादक स्वरुपाच्या विकासाच्या अनेक योजना पूर्ण करणे व त्याचबरोबर शेतमजुरांना काम देऊन त्यांची उपासमार रोखणे अशा दुहेरी हेतूने राज्य शासनाने रोजगार हमी या योजनेचा अंगिकार केला.

ग्रामीण भागातील व्यक्तींना रोजगार पुरविण्याच्या उद्दिष्टांचा एक भाग म्हणून प्रथम सन १९६९ मध्ये पागे योजनेत रोजगार हमी योजनेचा समावेश करण्यात आला. ही योजना राज्याच्या विविध जिल्ह्यात प्राथमिक स्वरुपात राबविताना आलेल्या अनुभवाच्या आधारावर दिनांक २८ मार्च, १९७२ पासून ग्रामीण भागात सर्वत्र या योजनेअंतर्गत रोजगाराची हमी देऊन पुढेच पाऊल टाकण्यात आले.

योजनेच्या सुरुवातीलाच म्हणजे सन १९७२ ते १९७४ या काळात राज्यात अनेक ठिकाणी अभूतपूर्व दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आणि शासनाला रोजगार हमी योजना बऱ्याच मोठ्या प्रमाणात निलंबित करुन दुष्काळी कामे सुरु करावी लागली.

ही योजना सन १९७४-७५ मध्ये पुन: सर्वत्र नव्याने सुरू करण्यात आली व त्यायोगे संबंध देशात महाराष्ट्र राज्याने बेरोजगाराला रोजगाराची हमी मिळवून देण्याच्या दिशेने प्रथम पाऊल टाकले.

दिनांक २९ सप्टेंबर १९७४ रोजी विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती माननीय श्री.वि.स.पागे यांनी राज्यातील सर्व पक्षांच्या प्रतिनिधीची एक बैठक निमंत्रित केली. या बैठकीत या योजनेसंबंधी एक सर्वसाधारण आराखडा निश्चित करण्यात आला व त्यास अनुसरुन विधानमंडळाच्या उभय सभागृहात दिनांक २० डिसेंबर, १९७४ रोजी मुख्य मंत्र्यांनी निवेदन केले. मुख्य मंत्र्याच्या या निवेदनाला उभय सभागृहांनी एकमुखी पाठिंबा दिला. या योजनेसाठी लागणाऱ्या निधीसाठी खास कर आकारावा अशी सूचनाही या निवेदनामध्ये करण्यात आली होती.

रोजगार हमी योजनेत मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम हे सूत्र अवलंबिण्यात आले आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७, दिनांक २६ जानेवारी, १९७९ पासून अंमलात आला आणि योजनेला वैधानिक आधार प्राप्त झाला. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक मूलगामी योजना सुरु करण्यात महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात अग्रणी राहिले आहे. या योजनेने देशातील इतर राज्यांचेसुध्दा लक्ष वेधून घेतले आहे. या योजनेनुसार अकुशल बेरोजगारांना त्यांच्या मागणीनुसार रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. उत्पादनभिमुख कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या या योजनेमुळे स्थायी स्वरुपाची संपत्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण केली जात आहे.

**:: रोजगार हमी योजनेचा उद्देश व हेतू ::**

सुयोग्य ग्रामीण विकासाचे धोरण आखून ग्रामीण भागातील संपत्तीच्या विकासाचा गंभीर प्रश्न सोडविणे या बाबीला नियोजनात दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी महत्व असणे आवश्यक आहे. ग्रामीण कामांचा कार्यक्रम, ग्रामीण रोजगारांचा धडक कार्यक्रम, पथदर्शी एकात्मिक ग्रामीण रोजगार कार्यक्रम, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम यासारखे क्षेत्रविकास कार्यक्रम आणि लहान सीमांत शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण कारागीर यांना सहाय्य करण्यासाठी घेतलेले कार्यक्रम यासारखे रोजगार निर्मिती कार्यक्रम हे मर्यादित व प्रायोगिक स्वरुपात होते. म्हणून या कार्यक्रमांद्वारे ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्याचा प्रश्न परिणामकारकरित्या सुटू शकला नाही. मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पासहित मृद व जलसंधारण व ग्रामीण विद्युतीकरण हे कार्यक्रम घेण्यात आले. परंतु पुरेशा साधनसंपत्ती अभावी ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्याचे कामी म्हणावे तितके यश आले नाही. महाराष्ट्रातील ग्रामीण तसेच "क" वर्ग नगरपालिका परिषद क्षेत्र धरुन समाजातील गरीब वर्गाला रोजगाराची हमी उपलब्ध करुन देऊन दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सन १९७२ मध्ये रोजगार हमी योजनेची सुरुवात करण्यात आली.

"क" वर्गीय, नगरपालिका परिषद क्षेत्र धरुन ग्रामीण भागातील कामाची गरज असलेल्या व कष्टाचे काम करण्याची तयारी असलेल्या पण स्वत:हून ते न मिळवू शकणाऱ्या सर्व अकुशल व्यक्तींना उत्पादक रोजगार मिळवून देणे हा रोजगार हमी योजनेचा मुख्य उद्देश आहे. व्यक्तीला उपयुक्त व राज्याच्या अर्थव्यवस्थेला उत्पादक असा रोजंगार पुरविला जातो. कामाची हमी ही अकुशल श्रमाच्या कामापुरती मर्यादित आहे. हाती घेतलेल्या कामातून टिकाऊ सामूहिक मालमत्ता निर्माण व्हावी व मजूरांना दिलेली मजूरी केलेल्या कामाच्या परिमाणाशी निगडीत असावी हा योजनेचा मूलभूत हेतू आहे.

## योजनेची पार्श्वभूमी –

१. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी १९७७ पासून महाराष्ट्रात सुरु झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार दोन योजना सुरु होत्या.

- ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना व
- महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारित २०१४) कलम १२(इ) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना.

सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

२. सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव – महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती. तद्नुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पुर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र, विधानमंडळाने केंद्रिय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळवण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे.

३. सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियिम, १९७७ (०६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरु आहेत :-

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र (MGNREGS)या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रती कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रती कुटुंब मजुरीच्या खर्चासाठी व साहित्यावरील ७५ टक्के खर्चासाठी निधी पुरवते. १०० दिवसावरील मजुरांच्या मजुरीच्या खर्चाचा व साहित्यावरील खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते. तसेच १०० दिवस प्रती कुटूंब पर्यंतच्या साहित्यावरील २५ टक्के खर्च राज्य शासन करते.

ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम (७) (दहा) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

उदा: १) जवाहर / धडक सिंचन विहिर योजना
२) रोहयोंतर्गत फळबाग लागवड योजना

या शिवाय राज्य शासनाचा निधी पुढील बाबींकरिता वापरला जातो :-

१) राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीपथावरील अपूर्ण (कुशल) कामे पुर्ण करण्याकरिता.

२) राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरिता.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची उद्दिष्टे

अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेंतर्गत १०० दिवस प्रती कुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असून, त्या माध्यमातून स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये

- १८वर्षावरील प्रौढ व्यक्तींना केंद्र शासनाची १०० दिवस प्रती कुटुंब अकुशल रोजगाराची हमी. तर १०० दिवसांवरील रोजगाराची राज्य शासनाची हमी.

### मजुरांची नोंदणी व जॉबकार्ड

- रोजगार मिळविण्याकरिता जॉब कार्ड आवश्यक
- जॉब कार्डसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करणे आवश्यक
- ग्रामपंचायत मार्फत नोंदणी
- १५ दिवसांत जॉब कार्ड मिळणार
- प्रत्येक कुटुंबाला विनामुल्य फोटोसह एक जॉब कार्ड
- जॉब कार्डची प्रत कुटुंबाकडे

### कामाची मागणी व अर्ज

- रोजगार आवश्यक असणा-या नोंदणीकृत व्यक्तीने वेळोवेळी नमुना क्र.४ मध्ये अर्ज करणे आवश्यक
- नमुना क्रमांक ४ ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध
- नमुना क्रमांक ४ मध्ये अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायतीने पोच पावती देणे आवश्यक
- रोजगाराची मागणी नोंदणीकृत व्यक्ती किंवा समूह नमुना ४ मध्ये करु शकतो
- मजुराने किमान १४ दिवस कामाची मागणी करणे आवश्यक
- मागणी केल्यानंतर मजुराला १५ दिवसांत ग्रामपंचायतीने रोजगार पुरविणे आवश्यक, अन्यथा बेरोजगार भत्ता मिळेल
- कामाच्या मागणीबाबत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी यांना तात्काळ माहिती द्यावी
- गावापासून ५ कि.मी.परिसरात रोजगार उपलब्ध केला जाईल, ०५ कि. मी. पेक्षा जास्त अंतराकरिता मजुरी दराच्या १० टक्के अतिरिक्त मजुरी देण्यात येईल.
- ग्रामपंचायतीद्वारे पूर्ण गावातील कामांचे नियोजन.

## सोयी व सुविधा

- कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार, विश्रांतीसाठी शेड, ५ पेक्षा जास्त लहान मुले असल्यास दायीची सोय.
- बँकेद्वारे अथवा पोस्टामार्फत १५ दिवसात मजुरीचे प्रदान, अन्यथा ०.०५ टक्के विलंबआकार देय.
- मजुरांना वेतन चिठ्ठीचे वाटप.

## मजुरीचे दर :

रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना देण्यात येणारी मजुरी पुर्वी रोहयो कायदा १९७७ च्या कलम (सात) (२) अन्वये संबंधित कृषि परिमंडळातील शेतमजुरांना देय असलेल्या किमान वेतनाशी निगडित होती. त्यावेळी शेतमजुरांचे किमान वेतन सुधारित करतांना उद्योग,उर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार मजुरीचे दर निश्चित केले जात होते. सन २०११ पासून केंद्र शासन महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ मधील कलम ६ नुसार प्रत्येक वर्षी मजुरी दर निश्चित करते. त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक २३ मार्च, २०२० च्या अधिसूचनेन्वये सन २०२०-२१ या वर्षाकरिता महाराष्ट्रासाठी रु.२३८/- प्रतिदिन इतका मजूरी दर निश्चित केला आहे.

- केंद्र शासन प्रत्येक वर्षी मजुरीचे दर ठरविते व ते केलेल्या कामाच्या प्रमाणात (मोजमापानुसार) मजूरांना अदा केले जाते.
- केंद्र शासनाने राज्यासाठी खालीलप्रमाणे मजुरीचे दर निश्चित केले आहेत.

| २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६८ | १८१ | १९२ | २०१ | २०३ | २०६ | २३८ | २५६ |

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्य रोजगार हमी योजना - फरक

| अ.क्र. | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | राज्य रोजगार हमी योजना |
|---|---|---|
| १ | खर्चाच्या किमान ५० टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत व त्यास ग्रामसभेची मान्यता | लाईन डिपार्टमेंटकडून अंमलबजावणी ग्रामपंयातीची भूमिका |
| २ | कंत्राटदारावर बंदी | कुशल कामासाठी कंत्राटदारांना परवानगी |

| | | |
|---|---|---|
| ३ | मजुरी बँक/पोस्टमार्फत लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा | मजुरी बँक/पोस्टमार्फत लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा |
| ४ | संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन रिपोर्टिंग व संनियंत्रण | ऑनलाईन रिपोर्टिंग नाही. |
| ५ | सामाजिक अंकेक्षण पारदर्शकता | सामाजिक अंकेक्षण नाही. |
| ६ | जॉब कार्डची आवश्यकता | जॉब कार्ड आवश्यक आहे. |
| ७ | १०० दिवसांच्या रोजगाराची केंद्रशासनाची हमी व त्यानंतर राज्यशासनाची हमी | १०० दिवसांवरील कामाची हमी |
| ८ | भूसंपादन होत नाही. | भूसंपादनाकरिता स्वतंत्र निधीची तरतूद आहे. |

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना व राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना-फरक

| अ.क्र. | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | राज्य रोजगार हमी योजना |
|---|---|---|
| १ | केंद्रिय कायद्याच्या परिशिष्ट १ मधील कलम १ (४) प्रमाणे | राज्य रोहयो कायद्याच्या कलम ७ (२) (१०) प्रमाणे |
| २ | **योजना**<br>अनुज्ञेय २६२ कामांची यादी संलग्न आहे. | **२. योजना**<br>१. रोहयो फळबाग लागवड<br>२. रोहयो तुती लागवड<br>३. खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड<br>४. मागेल त्याला शेततळे<br>५. धडक सिंचन विहीर योजना<br>६. पालकमंत्री शेत पाणंद रस्ते<br>७. ११००० सिंचन विहिर योजना<br>८. नरेगा अंतर्गत शेततळे |
| ३ | प्रत्यक्ष कामावर येणारा खर्च शासनाकडून करण्यात येतो. | अनुदान पध्दतीची प्रतिपूर्ती योजना |
| ४ | जॉब कार्ड आवश्यक आहे. | जॉबकार्डची आवश्यकता नाही |
| ५ | ग्रामसभेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व गटविकास अधिकारी प्रशासकिय मान्यता देतात. | विविध स्तरावर मान्यता |
| ६ | सर्वसधारणपणे ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी | विविध यंत्रणांकडून अंमलबजावणी |
| ७ | यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा नाही. | प्रतिपूर्ती योजना असल्यामुळे यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८ | १५ दिवसात मजूरी प्रदान करणे बंधनकारक आहे. | १५ दिवसात अनुदान देणे बंधनकारक नाही. |
| ९ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील तरतुदीनुसार परिच्छेद २ मधील लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. | राज्य शासनाच्या निकषांप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. |
| १० | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक. | राज्य शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक |

**रोहयो समितीच्या सदस्यांच्या सुलभ संदर्भाकरीता प्रश्नोत्तर स्वरुपातील माहिती खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र रोजगार हमी नियम, १९७७ (सुधारित २०१४ नुसार) रोजगार हमी योजनेसंदर्भात केंद्र शासनाच्या व राज्य शासनाचा हिस्सा किती व त्यांना किती निधी (टक्केवारीनुसार) प्राप्त होतो ? | <u>अकुशल खर्च</u><br>प्रति कुटूंब १०० दिवसांपर्यत अकुशल मजुरी केंद्र शासन अदा करते. १०० दिवसावरील मजुरी राज्य शासन अदा करते.<br>सन २०२०-२१ साठी केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याकरिता रू.२३८/- हा दर निश्चित करण्यात केला आहे.<br><u>कुशल खर्च</u><br>कुशल खर्चाच्या<br>७५% कुशल निधी केंद्र शासन अदा करते<br>२५% कुशल निधी राज्य शासन अदा करते.<br><u>प्रशासकिय खर्च निधी</u><br>६% प्रशासकिय खर्च निधी केंद्र शासन अदा करते<br>३% प्रशासकिय खर्च निधी राज्य शासन अदा करते. |
| २ | केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या अंतर्गत रोहयोतून कोणकोणती कामे घेता येतात व केंद्र शासनाची व राज्य शासनाची योजना कोणकोणत्या क्षेत्रासाठी लागू आहे ? | केंद्र शासनाने २६२ योजना अनुज्ञेय केल्या आहेत. त्यानुसारच कामे घेता येतात. सुलभ संदर्भाकरिता कामांची यादी संलग्न आहे आहे.<br>दिनांक ५.११.२०१९ नियोजन(रोहयो) विभाग शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१८/प्र.क्र.१३८/ मग्रारो-१-अन्वये अनुज्ञेय कामापैकी २८ कामांना केंद्र व शासनाचा विशिष्ट प्रमाणात निधी घेऊन अभिसरणांतर्गत कामे केली जातात. सदर शासननिर्णयाची प्रत संलग्न आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | केंद्र शासनाच्या व राज्य शासनाचा मजुरीचा दर व प्रतिकुटूंब दिवसासाठी रोजगाराची हमी देते ? | केंद्र शासन दरवर्षी राजपत्र प्रसिध्द करून राज्यनिहाय मजुरीचा दर निर्धारित करते त्यानुसार मजुरीचा दर मजुरांना अदा करण्यात येतो. सन २०२०-२१ साठी केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याकरिता रू.२३८/- हा दर निश्चित करण्यात केला आहे. केंद्र शासन प्रतिवर्ष प्रतिकुटूंब १०० दिवस रोजगाराची हमी देते. शासनाच्या सुलभ संदर्भाकरिता केंद्र शासनाने काढलेल्या राजपत्राची प्रत सोबत जोडली आहे. |

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना -महाराष्ट्र अंतर्गत अनुज्ञेय कामे :-**

**प्रवर्ग अ : नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे**

(एक) पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यासारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जलसंधारणाची व जलसंचयाची बांधकामे;

(दोन) व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतल बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबांध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यांसारखी जलव्यवस्थापन विषयक कामे;

(तीन) सूक्ष्म व लघु पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नूतनीकरण करणे व परिरक्षण करणे;

(चार) सिंचन तलाव व इतर जलाशये यांमधील गाळ उपसण्यासह पारंपारिक जलाशयांचे नूतनीकरण करणे;

(पाच) परिच्छेद ४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंबांना फलोपयोग घेण्याचा रीतसर हक्क मिळवून देईल असे, सर्व सामान्य व वन जमिनींवरील सडक पट्टया, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्षरोपण, वृक्षलागवड आणि फलोत्पादन;

(सहा) सामूहिक जमिनीवरील भूविकासाची कामे.

**प्रवर्ग ब : दुर्बल घटकाकरिता व्यक्तिगत मत्ता (फक्त अधिनियमातील अनुसूची दोन परिच्छेद ४ मध्ये उल्लेखिलेल्या कुटुंबाकरिता):**

(एक) भूविकासामार्फत तसेच खोदविहिरी, शेततळी व इतर जलसंचयाच्या संरचनांसह सिंचनाकरिता योग्य त्या पायाभूत सुविधा उभारुन परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट कुटुंबांच्या जमिनींची उत्पादकता वाढवणे;

(दोन) फलोत्पादन, रेशीम उत्पादन, रोपमळा व प्रक्षेत्र वनीकरण यामार्फत उपजीविकेची साधने वाढवणे;

(तीन) परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबांच्या पडीक अथवा उजाड जमिनी लागवडीखाली आणण्याकरिता त्या जमिनींचा विकास करणे;

(चार) इंदिरा आवास योजनेंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाच्या अशा अन्य योजनेंतर्गत मंजूर केलेल्या घरांच्या बांधकामामधील अकुशल वेतन घटक;

(पाच) पशुधनाला चालना देण्याकरिता कुक्कुटपालन संरचना, शेळीपालन संरचना, वराहपालन संरचना, गुरांचा गोठा, गुरांना चारा देण्यासाठी गव्हाणी व पाणी देण्यासाठी हाळ यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे; आणि

(सहा) मत्सव्यवसायाला चालना देण्याकरिता मासे सुकविण्यासाठी ओटे, साठवण सुविधा यांसारख्या तसेच सार्वजनिक जमिनीवरील हंगामी जलाशयांमधील मत्स्यशेतीला चालना देण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे.

**प्रवर्ग क : राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांकरिता सामाईक पायाभूत सुविधा**

(एक) जैविक खतांकरिता आवश्यक असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारुन आणि कृषि उत्पादनांसाठी पक्क्या स्वरुपाच्या साठवण सुविधांसह हंगामोत्तर सुविधा उभारुन कृषि उत्पादकतेस चालना देण्याबाबतची कामे; आणि

(दोन) स्वयं - सहायता गटांच्या उपजिविकेच्या उपक्रमांकरिता सामाईक कार्यकक्ष.

**प्रवर्ग ड : ग्रामीण पायाभूत सुविधा**

(एक) हगणदारीमुक्त गावाचा दर्जा संपादन करण्याच्या उद्देशाने एकतर स्वतंत्रपणे किंवा शासकीय विभागाच्या इतर योजनांच्या अभिसरणातून व्यक्तिगत घरगुती शौचालय, शाळेतील प्रसाधनगृहे, अंगणवाडी-प्रसाधनगृहे आणि विहित मानकांनुसार घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन यांसारखी ग्रामीण स्वच्छते संबंधातील कामे.

(दोन) रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणी आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्रे विद्यमान पक्क्या रस्त्यांच्या जाळयाशी जोडणे; आणि गावामधील पार्श्व नाली व मोऱ्या यासह अंतर्गत पक्के रस्ते अथवा मार्ग बांधणे.

(तीन) खेळाची मैदाने उभारणे.

(चार) ग्राम व गट स्तरावर पूरनियंत्रण व संरक्षण कामांसह आपत्कालीन सिध्दता ठेवणे अथवा रस्ते पूर्ववत करणे अथवा इतर आवश्यक सार्वजनिक पायाभूत सुविधांचे पुनर्स्थापन करणे, सखल भागात जलनि:स्सारण व्यवस्थेची तरतूद करणे, पुराचे पाणी वाहून नेणारे प्रवाह मार्ग खोल करणे व त्यांची डागडुजी करणे, प्रवनिकेचे नूतनीकरण करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्याचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन) बांधकाम करणे.

(पाच) ग्राम व गट स्तरावर ग्रामपंचायती, महिला स्वयं-सहाय्यता गट, संघ, चक्रीवादळ छावणी, अंगणवाडी केंद्रे, गावबाजार व स्मशानभूमी इत्यादींकरिता इमारती बांधणे.

(सहा) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता अन्नधान्य साठवण इमारती बांधणे.

(सात) अधिनियमांतर्गत करावयाच्या बांधकामाचा अंदाजाचा भाग म्हणून त्याकरिता लागणाऱ्या बांधकाम साहित्याची निर्मिती करणे.

(आठ) अधिनियमांतर्गत निर्माण केलेल्या ग्रामीण सार्वजनिक मत्तांचे परिरक्षण करणे.

(नऊ) राज्य शासन यासंदर्भात अधिसूचित करील अशी इतर कोणतीही कामे; आणि

(दहा) केंद्र सरकार राज्य शासनाशी विचारविनिमय करुन अधिसूचित करेल असे अन्य कोणतेही काम.

- प्रत्येक ग्रामपंचायत, स्थानिक क्षेत्राची क्षमता, स्थानिक गरजा व साधनसंपत्ती विचारात घेऊन व परिच्छेद ८ च्या तरतुदींनुसार, ग्रामसभेच्या सभांमध्ये प्रत्येक कामाचा प्राथम्यक्रम निर्धारित करील.
- गवत कापणे, खडीकरण करणे, शेतीची कामे यांसारखी अमूर्त स्वरुपाची, मोजता न येण्याजोगी व वारंवार उद्भवणारी कामे हाती घेण्यात येणार नाहीत.

## निधीचे व्यवस्थापन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत वित्तीय वर्षात कुटुंबाला १०० दिवसांची अकुशल रोजगाराची हमी केंद्र शासनाने दिलेली आहे, तर १०० दिवसांवरील प्रत्येक मजुराला, रोजगाराची हमी राज्य शासनाने दिली आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ च्या तरतुदीनुसार योजनेंतर्गत होणा-या खर्चाचा भार केंद्र शासन व राज्य शासन खालीलप्रमाणे उचलते:

१) केंद्र शासन खालील बाबींवरील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत खर्चाचा भार उचलते:

१) वित्तीय वर्षात प्रतिकुटुंबाच्या १०० दिवसांच्या अकुशल मजुरीवरील खर्च.

२) साधनसामुग्री, कुशल व अर्धकुशल मजुरांच्या रोजंदारीवरील एकूण खर्चाच्या ७५ टक्के खर्च.

३) केंद्र शासनाने ६% प्रशासकीय खर्च अनुज्ञेय केलेला आहे

ब) राज्य शासन खालील बाबींवरील खर्चाचा भार उचलते:

१) राज्य रोहयोकरिता वैयक्तिक लाभांच्या योजनांवरील खर्च (उदा. जवाहर/धडक सिंचन विहिरी, फलोत्पादन).

२) जुन्या रोहयोची अपूर्ण कामे.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २५% कुशल खर्च.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत १०० दिवसांवरील प्रति कुटुंबावर होणारा मजुरीचा तसेच सामुग्रीचा खर्च.

५) मजुराने कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसांत काम उपलब्ध करुन न दिल्यास देय बेरोजगारी भत्याचा खर्च.

२३/५/२५

योजने करीता वितरीत निधी :

सदर योजना ही मागणी प्रवण (Demand Driven Scheme) आहे. राज्यात २०१९-२० या वर्षात एकुण रु.१८२५.६८ कोटी इतका खर्च झालेला आहे.

**योजनेकरिता वितरीत निधी - २०२०-२१**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

(रुपये कोटी)

| तपशील | चालु वर्षातील वितरीत निधी |
|---|---|
| केंद्र शासनाकडून वितरीत निधी | २१८.०४ |
| राज्य शासनाकडून वितरीत निधी | ६६.६६ |
| एकुण उपलब्ध | २८४.७० |

आर्थिक प्रगती अहवाल

| सन २०२०-२१ चा एकूण नियतव्यय | | | ०४ जानेवारी,२०२१ अखेर पर्यंत प्राप्त झालेला निधी | | | | खर्चासाठी एकुण उपलब्ध निधी | ०४ जानेवारी, २०२१ अखेर पर्यंत खर्च झालेला निधी | खर्चाची टक्केवारी रकाना ७ मधील निधीनुसार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| केंद्र | राज्य | एकुण | केंद्र शासन (प्राप्त निधी) | राज्य शासन (वितरीत निधी) | मागील वर्षाचा शिल्लक राज्य निधी | एकुण | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १५७१.६२ | ११५०.०० | २७२१.६२ | २१८.०४ | ६६.६६ | -- | २८४.७० | २८४.७० | १८६.७० | ६५.५७% |

**निधी वितरण**

(रु.कोटी)

| | २०२०-२१ | २०१९-२० | २०१८-१९ |
|---|---|---|---|
| केंद्र शासन | २१८.००<br>९८५.०० (मजुरी) | १८५७.१० | ११५३.४२ |
| राज्य शासन | ६६.६६<br>५०.०० (मजूरी) | ५००.४२ | ८२१.५६ |
| एकूण | १३१९.६६ | २३५७.५२ | २७७५.०४ |

## महात्मा गांधी नरेगा अंतर्गत सिंचन विहिरींबाबतची माहिती :-

शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१२ अन्वये राज्यात महात्मा गांधी नरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याला सिंचन विहिरींचा लाभ देण्यात येतो. सदर शासन निर्णयानुसार रू. ३ लक्ष रकमेपर्यंत लाभार्थ्याला लाभ देता येतो. महात्मा गांधी नरेगा अंतर्गत खालील लाभार्थ्याला सिंचन विहिरींचा लाभ देण्यात येतो.

अ) अनुसुचित जाती आ) अनुसूचित जमाती इ) भटक्या जमाती (Nomadic Tribes)

ई) भटक्या विमुक्त जमाती (Denotified Tribes)

उ) दारिद्रय रेषेखालील इतर कुटूंबे ऊ) महिलाप्रधान कुटूंबे

ए) शारीरिक अपंगत्व प्रधान असलेली कुटूंबे

ऐ) भू-सुधार योजनेचे लाभार्थी ओ) इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी

औ) अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वन्य निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम-२००६ नुसार पात्र व्यक्ती

अं) कृषि कर्ज माफी योजना सन २००८ नुसार अल्प भूधारक [१ हेक्टर पेक्षा जास्त पण २ हेक्टर (५ एकर) पर्यन्त जमीन असलेला शेतकरी जमीन मालक/कुळ) ] व सिमांत शेतकरी [१ हेक्टर पर्यन्त जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक / कुळ)]

केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनांनुसार एका ग्रामपंचायत हद्दीतील उपरोक्त प्रवर्ग अ) ते औ) मधील लाभार्थ्यांना सर्वप्रथम लाभ देण्यात येतो व त्या ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रवर्ग अ) ते औ) मधील लाभार्थी संपल्यांनतर अल्पभूधारक व सिमांत शेतकऱ्यांना लाभ देण्यात येतो.

शासन परिपत्रक दि.२८ऑगस्ट, २०२० अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये त्या ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## महात्मा गांधी नरेगाअंतर्गत शेततळयाची माहिती :-

महात्मा गांधी नरेगाअंतर्गत कृषी विभागामार्फत शेततळयाची कामे शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ नुसार अनुज्ञेय करण्यात आली होती. आता दिनांक १४ सप्टेंबर,२०१५ शासन निर्णयान्वये शेततळयाची कामे ग्रामपंचायत/यंत्रणामार्फत घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. ग्रामपंचायतीमार्फत छोटया आकारमानाची शेततळे (१०X१०X१०X३ मी., १५X१०X३मी., १५X१५X३मी.,) व कृषि विभाग व इतर यंत्रणा यांचेमार्फत सर्व विहित आकारमानाची शेततळे घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामे करताना शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात आले आहे. महात्मा गांधी नरेगा योजनेंतर्गत मोठ्या आकारमानाची शेततळ्याची कामे ग्रामपंचायतीमार्फत घेण्यास आता दिनांक १३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ अन्वये निर्धारित

करण्यात आलेली सर्व विहित आकारमानाची शेततळे ग्रामपंचायतीमार्फत घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

## वृक्ष लागवड :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ अंतर्गत राज्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना टप्प्याटप्प्याने सुरु करण्यात आल्यानंतर शासन निर्णय दि.२३ डिसेंबर, २००५ अन्वये अनुज्ञेय कामांमध्ये रोपवाटिका व वृक्ष लागवड इ. कामांचा समावेश करण्यात आला. सदर कामे ग्रामपंचायत, कृषि विभाग, वन विभाग तसेच सामाजिक वनिकरण विभागामार्फत राबविण्यात येतात. शासन निर्णय दि.१२ एप्रिल, २०१८ अन्वये ३४ वृक्षाच्या प्रजातीचा वृक्ष लागवडीमध्ये समावेश करण्यात आला आहे. शासन पत्र दि.१ ऑक्टोबर, २०२० अन्वये वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर गुलाब, मोगरा व निशीगंध या फुलपिकांच्या लागवडीकरिता अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

## तुती लागवड :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येणाऱ्या रेशीम उद्योग विकास योजनेअंतर्गत तुती लागवड कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्यास व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना रेशीम किटक सांगोपन गृहाचे बांधकाम करण्यास दि.३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

## अभिसरण आराखडा :-

शासन निर्णय दि.५ नोव्हेंबर, २०१८ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्य अभिसरण आराखडा तयार करण्यात आला असून त्याअन्वये इतर विभागाच्या योजनांशी सांगड घालून, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन २८ कामे घेण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

## फलोत्पादन योजना

राज्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमाण जवळपास ८५ टक्के असल्याने या शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लक्षावधी अल्प आणि अत्यल्प भूधारकांच्या शेती पध्दतीत परिवर्तन घडवून आणून पावसाच्या लहरीपणामुळे या शेतक-यांची आर्थिक दुर्बलता यावर मात करण्याच्या दृष्टीने सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन कार्यक्रम कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

सन २००५-०६ पासून लागवड करण्यात येणाऱ्या फळपिकांकरिता अनुदान वाटप एकूण अनुदानाच्या पहिल्या वर्षी ५० टक्के, दुसऱ्या वर्षी ३० टक्के व तिसऱ्या वर्षी २० टक्के या प्रमाणात देय असून, लाभधारकांचे अनुदान त्यांच्या बँक खात्यामध्ये धनाकर्षाद्वारे जमा करण्यात येते.

सन २००५-०६ पासून लागवड करण्यात येणाऱ्या सर्व फळपिकांकरिता (बागायती व कोरडवाहू) ज्या लाभार्थ्यांची दुसऱ्या वर्षी ७५ टक्के आणि तिसऱ्या वर्षी ९० टक्के झाडे जिवंत असतील त्या लाभार्थ्यांना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय आहे.

## धडक सिंचन विहीर योजना

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यांकरिता धडक सिंचन विहीर कार्यक्रम सन २००६ पासून घेण्यात आला आहे. विदर्भातील ६ जिल्ह्यांकरिता धडक सिंचन विहीरीचा १००० विहीरी प्रतितालुका याप्रमाणे एकूण ६४,००० विहीरींचा मूळ लक्षांक व ३०० विहीरी प्रतितालूका याप्रमाणे १९,२०० विहीरींचा वाढीव लक्षांक असा एकूण ८३,२०० विहीरींचा लक्षांक मंजूर करण्यात आला आहे.

धडक सिंचन विहीर कार्यक्रमासाठी लाभार्थ्यांच्या निवडीबाबत शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००९ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार लाभार्थी निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत :-

१. ज्या शेतकरी कुटूंबात आत्महत्या म्हणून आपत्ती आली आहे व त्यांच्याकडे विहिरी नाहीत अशा सर्व अनुसूचित जाती / जमाती/ सर्व साधारण (फेरफारानुसार) लाभार्थी (दीड एकर ते १६ एकर पर्यन्त जमीन)

२. वरील "एक" प्रमाणे विहीरीसाठी लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर जेवढा विहीरींचा लक्षांक शिल्लक राहील त्यापैकी ५० टक्के विहिरी या दीड एकर ते ८ एकर पर्यन्तच्या शेतक-यांना व उर्वरित ५० टक्के विहिरी या ८ एकराच्या वरील व १६ एकरा पर्यन्तच्या शेतक-यांना देण्यात याव्यात. यामध्ये कमीत कमी ३० टक्के मागासवर्गीय लाभार्थी असणे आवश्यक राहील.

धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत लाभार्थी निवडीसाठी दिनांक २३.३.२०११ च्या शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे:-

| | |
|---|---|
| १. संबंधित जिल्हाचे मा. पालकमंत्री | अध्यक्ष |
| २. संबंधित जिल्हाचे मा. संपर्कमंत्री | सह अध्यक्ष |
| ३. जिल्हाधिकारी | सदस्य |
| ४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५. वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | सदस्य |
| ६. कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद | सदस्य |
| ७. उप जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

सन २००७-०८ व २००८-०९ मधील धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील देण्यात आलेल्या लक्षांकापैकी लाभार्थी निकषानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच लहान

व सिमांत शेतकरी या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांच्या विहीरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना -महाराष्ट्र या योजने अंतर्गत वर्ग करण्यात आल्या आहेत. इतर लाभार्थ्यांच्या धडक सिंचन विहीरींच्या देय असलेल्या रू. एक लक्ष अनुदानात वाढ करण्यात आली असून सदर अनुदान रु.२.५० लक्ष च्या मर्यादेत करण्यात आले आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

- विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांमध्ये विहिरींची असलेली विहिरींची कमी संख्या व भुगर्भात असलेल्या पाणीसाठयामुळे सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी विभागाच्या दिनांक १५.१२.२००६ च्या शासन निर्णयान्वये उक्त ६ जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात १००० याप्रमाणे ६४ तालुक्यांना मिळून ६४,००० सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.
- नियोजन विभागाच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत धडक सिंचन विहीर कार्यक्रमास दिनांक ३० जुन, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
- नियोजन विभागाच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत धडक सिंचन विहीर कार्यक्रमाअंतर्गत दिनांक २७.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पुनर्जिवित करण्यात आलेल्या ८००७ विहिरींपैकी रद्द करण्यात आलेल्या २९८५ विहिरी पून्हा पूनर्जिवित करुन पूर्ण करण्यास दिनांक ३० जुन, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

## नागपूर विभागात ११००० सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रम

नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर या पाच जिल्हयांत सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम घेण्याबाबत दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये एकूण ११,००० विहीरींचा लक्षांक देण्यात आला. तद्नंतर गडचिरोली जिल्हयास ६१४ विहिरींचा अतिरिक्त लक्षांक विभागाच्या दि.७.१.२०१७ च्या पत्रान्वये वाढवून देण्यात आला आहे.

- नियोजन विभागाच्या दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ रोजी नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर जिल्ह्यांमध्ये सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रमाअंतर्गत अतिरिक्त १३,००० सिंचन विहिरींचा लक्षांक व योजनेत वर्धा जिल्ह्याचे समावेश करण्यात आले आहे.

## "मागेल त्याला शेततळे" योजना

सदयस्थितीत राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता, शेतक-यांकडे स्वत:ची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासाठी शेततळी घेणे आवश्यक असल्याने राज्यात "मागेल त्याला शेततळे" योजनेची अनुदान पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये पहिल्या टप्प्यात एकूण ५१,५०० शेततळयांचा लक्षांक देण्यात आला आहे. शासनाच्या दि १० ऑक्टोबर, २०१६ च्या शासननिर्णयान्वये राज्यात मागेल त्याला शेततळे योजनेची अनुदान पद्धतीने अंमलबजावनी करण्यास मुदतवाढीसह मान्यता देण्यात येत आहे. ५० पैसे आणेवारीची अट शिथील करुन १,११,१११ इतक्या अर्जाचे सुधारीत लक्षांक देण्यात आला काही जिल्ह्यांमध्ये लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्याने नंदुरबार- ५००, व अहमदनगर-७०० या जिल्ह्यांना एकूण १२०० इतका वाढीव लक्षांक देण्यात आल्याने शेततळ्याचा लक्षांक ११२३११ झालेला आहे.

### लाभार्थी पात्रता:-

- शेतकऱ्यांकडे त्याच्या नावावर कमीतकमी ०.६० हेक्टर जमीन असावी. यात कमाल मर्यादा नाही.
- लाभार्थी शेतकऱ्याची जमीन शेततळयाकरिता तांत्रिक दृष्टया पात्र असणे आवश्यक राहील. जेणेकरुन पावसाचे वाहणारे पाणी शेततळयामध्ये भरणे अथवा पुनर्भरण करणे शक्य होईल
- यापुर्वी अर्जदारांनी शेततळे, सामुदायिक शेततळे अथवा भात खाचरा सोबत तयार होणारी बोडी या घटकांचा शासकीय योजनांमधून लाभ घेतलेला नसावा.

### लाभार्थी निवडप्राथम्यक्रम:-

- दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) शेतकरी व ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या झालेली आहे, त्यांच्या वारसांना निवड प्रक्रीयेमध्ये जेष्ठता यादीत सूट देऊन प्रथम प्राधान्याने त्यांची निवड करण्यात यावी.

➢ वरील व्यतिरिक्त इतर सर्व प्रवर्गातील शेततळे मागणी करणा-या शेतक-यांची जेष्ठता यादीनुसार (प्रथम अर्ज सादर करणा-यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे) सदर योजने अंतर्गत निवड करण्यात यावी.

➢ शेततळ्याअंतर्गतचा निधी DROUGHT MITIGATION MEASURES म्हणून मदत व पुनर्वसन विभागा मार्फत उपलब्ध होणार असल्याने मागील ५ वर्षात एक वर्ष तरी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावांमधील लाभार्थी या योजनेसाठी पात्र राहतील. ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असणाऱ्या गावांची यादी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करावी.

➢ <u>शेततळ्यासाठी अनुज्ञेय आकारमान:-</u>

इनलेट आऊटलेटसह व इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे

| अ.क्र. | शेततळ्याचे आकारमान | पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) | होणारे खोदकाम (घ.मी.) |
|---|---|---|---|
| अ.इनलेट आऊटलेटसह शेततळे | | | |
| १. | १५x१५x३ मीटर | २२५ | ४४१ |
| २ | २०x१५x३ मीटर | ३०० | ६२१ |
| ३ | २०x२०x३ मीटर | ४०० | ८७६ |
| ४ | २५x२०x३ मीटर | ५०० | ११३१ |
| ५ | २५x२५x३ मीटर | ६२५ | १४६१ |
| ६ | ३०x२५x३ मीटर | ७५० | १७९१ |
| ७ | ३०x३०x३ मीटर | ९०० | २१९६ |
| ब. इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे | | | |
| १ | २०x१५x३ मीटर | ३०० | ६२१ |
| २ | २०x२०x३ मीटर | ४०० | ८७६ |
| ३ | २५x२०x३ मीटर | ५०० | ११३१ |
| ४ | २५x२५x३ मीटर | ६२५ | १४६१ |
| ५ | ३०x२५x३ मीटर | ७५० | १७९१ |
| ६ | ३०x३०x३ मीटर | ९०० | २१९६ |

➢ शेततळ्यांच्या उपरोक्त नमुद आकारमानांनुसार अनुदानाची रक्कम देय होईल. तथापि देय अनुदानाची कमाल रक्कम रुपये ५०,०००/- इतकी राहील. रु.५०,००० पेक्षा जास्त खर्च झाल्यास उर्वरीत रक्कम संबंधीत लाभार्थीने स्वत: खर्च करणे अनिवार्य राहील.

➢ त्याचप्रमाणे जास्तीत जास्त पाच शेतक-यांचा गट करून त्यांना एकत्रितरित्या सामुदायिक शेततळे घेता येईल. या शेततळ्याचे आकारमान अनुज्ञेय आकारमानाच्या प्रमाणात राहील. एकत्रित खोदकामाची घनमीटरची अट पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच त्यांना मिळणारे अनुदान व पाण्याचा वापर, पाण्याची हिस्सेवार याबाबत संबंधित शेतक-यांनी करार करावा.

## शेत/पाणंद रस्ते

शासन निर्णय क्र.रोहयो-२०१७/प्र.क्र.२७९/ रोहयो-१०अ, दिनांक २७ फेंब्रुवारी,२०१८ अन्वये "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. शेत/पाणंद रस्ते हे प्रामूख्याने शेतीमधील कामाकरीता आवश्यक असणारे साधनांची ने-आण करण्याकरीता उपयोगात येतात. पावसाळयामंध्ये शेत/पाणंद रस्ते सुयोग्य असणे गरजेचे आहे. पावसाळ्यामध्ये शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रसामुग्रीची वाहतूक शेत/पाणंद रस्ते योजनेमुळे सुयोग्य झाली आहे या योजनेनुसार:-१) कामे - राज्यात शेतरस्ते/पाणंद रस्ते तयार करणे, शेतरस्त्यावरील अतिक्रमण काढणे, माती, दगड, मुरुम व खडी टाकून शेतरस्त्याचे मजबुतीकरण करणे इत्यादी कामे केली जातात.२) निधी -शेतरस्ते/पाणंद रस्ते करण्याकरीता १४ वा वित्त आयोग, खासदार/आमदार स्थानिक विकास निधी, ग्रामपंचायतीला जनसुविधांकरीता मिळणारे अनुदान, मोठ्या ग्रामपंचायतीला नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान, गौण खनिज विकास निधी / जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी, ग्रामपंचायतींना मिळणारे महसूली अनुदान, जिल्हा परिषद / पंचायत समिती सेस मधून उपलब्ध होणारा निधी, ग्रामपंचायतीचे स्व-उत्पन्न, पेसा अंतर्गत उपलब्ध होणारा निधी (अनुसूचित क्षेत्रातील गावाकरीता), ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम (आदिवासी उपयोजना गावाकरीता), नाविन्यपूर्ण योजना, वैधानिक विकास महामंडळांतर्गत उपलब्ध होणारा निधी, इतर जिल्हा योजना (Other District Scheme), मनरेगा अंतर्गत प्राप्त निधी इत्यादी विविध स्त्रोतातून उपलब्ध होणा-या निधी मधून खर्च करण्यात येतो. विभागाच्या दिनांक २५ मे,२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हयास रु.१.५० कोटी याप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये ३४ जिल्हयांना एकूण रुपये ५१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.तसेच शेत/पाणंद रस्त्यांकरिता उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद ३ मधील (भाग-ब) नुसार कार्यवाही करण्याकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले असून अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे.

**शुल्क मधून सूट** - शेत/पाणंद रस्ते योजना राबविण्यासाठी विशेष बाब म्हणून पुढील बाबींवर सूट देण्यात येत आहे.

- शेत/पाणंद रस्त्याकरीता गौणखनीज स्वामीत्व शुल्क यामधून सूट देण्यात आली आहे.
- मोजणीकरीता कोणतेही मोजणी शुल्क आकारण्यात येत नाही. शेत/पाणंद रस्त्याकरीता मोजणी ही तातडीची मोजणी म्हणून करण्यात येते.
- तहसिलदार यांनी आदेशीत केल्यानंतर मोजणी, अतिक्रमण काढणे, रस्ता बांधकाम याकरीता पोलीस बंदोबस्ताकरीता कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही.

## राज्य रोजगार हमी योजनेतील भूसंपादन :

- रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या पाझर तलावांच्या कामासाठी भूसंपादनाची कार्यवाही करावी लागते.
- रोजगार हमी योजनेतील ज्या पाझर तलावांच्या कामासाठी भूधारकांच्या जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत, अशा भूधारकांना त्यांच्या जमिनीचा मोबदला दिला जातो.
- मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार व भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतूदीनुसार संबंधित भूधारकास मोबदला देण्याबाबतची कार्यवाही केली जाते.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव पातळीवरील कामांच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता आणणे व उत्तरदायित्त्व निश्चित करणे यासाठी केंद्र शासनाने दिनांक ३० जून, २०११ च्या अधिसूचनेन्वये योजनेचे अंकेक्षण नियम २०११ तयार करुन सामाजिक अंकेक्षणाबाबत धोरण निश्चित केले आहे. या धोरणानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायत हद्दीमध्ये झालेल्या अथवा सुरु असलेल्या कामांची पाहणी व देखरेख ग्रामसभा करु शकेल तसेच या कामांचे सामाजिक अंकेक्षण करु शकेल. केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार योजने अंतर्गत कामांचे सामाजिक अंकेक्षण करणेसाठी राज्य शासनाने सामाजिक अंकेक्षण संचालनालयाची स्थापना करुन सामाजिक अंकेक्षण करण्याची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग (रोहयो), शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.३२/रोहयो-६अ, दि. ४ डिसेंबर, २०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर सोसायटीची नोंदणी धर्मदाय आयुक्त, मुंबई यांचेकडे करण्यात आली असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली दि. १७ जानेवारी, २०१८ रोजी नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

सामाजिक अंकेक्षण प्रक्रिये अंतर्गत लाभार्थी स्वत: व योजनेतील सहभागी घटक त्या योजनेचे अथवा कार्यक्रमाचे मुल्यमापन करतात. सामाजिक अंकेक्षण एक निरंतर प्रक्रिया असून लाभार्थ्यांच्या सहभागातून योजनेचे अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता व सामाजिक उत्तरदायित्त्व राखण्यासाठी सामाजिक अंकेक्षण आवश्यक आहे. या योजनेतील प्रत्यक्ष काम करणारे मजुर तसेच गावातील इतर नागरीक गावात झालेल्या कामांची स्वतंत्ररीत्या पडताळणी करतात.

---

**"शरद पवार ग्रामसमृध्दी योजना" राज्य योजना म्हणून राबविणेबाबत :-**

शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०२०/प्र.क्र.७०/रोहयो-७ दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ नुसार ग्रामीण भागातील कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक पात्र लाभार्थ्याला शरद पवार ग्रामसमृध्दी योजने अंतर्गत खालील नमूद केलेल्या ४ वैयक्तिक कामांना सर्वोत्तम प्राधान्यक्रमाने सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात राबविण्यात यावे.

दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२ शासन निर्णयामधील एका गावात जास्तीत जास्त ५ गोठ्यांची मर्यादा या शासन निर्णयान्वये वगळण्यात येत आहे.

**१) गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे :-**

सदर कामाचा लाभ मिळणविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तीक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील. गोठ्यांच्या प्रस्तावासोबत जनावरांचे टॅगिंग आवश्यक राहील.

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक ७५ नुसार नरेगा अंतर्गत रुपये ७७,१८८/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ६,१८८/- | (प्रमाण ८ टक्के) |
| कुशल खर्च | - | रु. ७१,०००/- | (प्रमाण ९२ टक्के) |
| एकूण | - | रु. ७७,१८८/- | (प्रमाण १०० टक्के) |

उपरोक्त शासन परिपत्रकातील ६ गुरांसाठीची तरतूद रद्द करुन दोन गुरु ते ६ गुरे करिता एक गोठा व त्यानंतरच्या अधीकच्या गुरांसाठी ६ च्या पटीत म्हणजेच १२ गुरांसाठी दुप्पट व १८ पेक्षा जास्त गुरांसाठी ३ पट अनुदान देय राहील मात्र ३ पटीपेक्षा जास्त अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

**२) शेळीपालन शेड बांधणे :-**

शेळीपालन हा ग्रामीण भागातील अल्प उत्पन्न गटातील कुटूंबाच्या उपजिवीकेचे महत्वाचे साधन आहे. अल्प उत्पन्न असलेल्या ग्रामीण भागातील कुटूंबाच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्यासाठी शेळीपालन या व्यवसायकरिता मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. याकरिता मागणी केलेल्या प्रत्येक कुटूंबास नरेगा योजनेअंतर्गत शेळीपालन शेड बांधणे हे काम उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदर कामाचा लाभ मिळविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तिक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील. तसेच भूमिहीन (शेती नसेलेले) कुटूंबाना प्राधान्य देण्यात यावे.

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक ७६ नुसार नरेगा अंतर्गत रुपये ४९,२८४/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ४,२८४/- | (प्रमाण ८ टक्के) |
| कुशल खर्च | - | रु. ४५,०००/- | (प्रमाण ९२ टक्के) |
| एकूण | - | रु. ४९,२८४/- | (प्रमाण १०० टक्के) |

**लाभार्थ्यांने शेळीची व्यवस्था स्वत: करणे :-**

शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे १० शेळ्यांचा एक गट दिला जातो. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबी पहाता किमान दोन शेळ्या असलेल्या भूमिहीन मजुरांना/शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय करणे योग्य होईल. तसेच हेही स्पष्ट करण्यात येते की, शेळीपालनाच्या शेडसाठी प्रत्येक दहा शेळयांसाठी एक गट समजण्यात येईल व त्याप्रमाणे परिपत्रकानुसार अनुदान अनुज्ञेय करण्यात येईल तसेच ज्या लाभार्थ्याकडे १० पेक्षा अधीक शेळ्या असतील त्यांना शेळ्यांसाठीचे दोन गट लक्षात घेवून दोन पट अनुदान राहील. मात्र एका कुटुंबास जास्तीत जास्त ३० शेळ्यांकरिता तीन पट अनुदान मंजूर करण्यात येईल.

**३) कुक्कुटपालन शेड बांधणे :-**

परसातील कुक्कूट पालनामुळे ग्रामीण भागातील कुटूंबाना पूरक उत्पादनाबरोबरच आवश्यक पोषक प्राणीजन्य प्रथिनांचा पुरवठा होतो. सदर कामाचा लाभ मिळविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तीक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील. तसेच भूमिहीन (शेती नसलेले) कुटूंबाना प्राधान्य देण्यात यावे.

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक ७७ नुसार नरेगा अंतर्गत रुपये ४९,७६०/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ४,७६०/- | (प्रमाण १० टक्के) |
| कुशल खर्च | - | रु. ४५,०००/- | (प्रमाण ९० टक्के) |
| एकूण | - | रु. ४९,७६०/- | (प्रमाण १०० टक्के) |

**लाभार्थ्याने पक्ष्यांची व्यवस्था स्वत: करणे :-**

सध्या शासन परिपत्रकानुसार १०० पक्ष्यांकरिता अनुदान अनुज्ञेय आहे. मात्र यामध्ये असे स्पष्ट करण्यात येते की, ज्या शेतकऱ्यांना / शेतमजूरांना कुक्कुटपालन करावयाचे आहे. परंतू, १०० पेक्षा अधीक पक्षी ज्यांच्याकडे नाहीत अशा लाभार्थ्यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर दोन जामिनदारांसह कुक्कुटपालन शेडची मागणी करावी व त्यानुसार संबंधीत यंत्रणेने संबंधीत लाभार्थ्यांस शेड मंजूर करावे व शेडचे काम पूर्ण झाल्यानंतरच्या १ महिन्यांच्या कालावधीत कुक्कुटपालन शेडमध्ये १०० पक्षी पाळण्यासाठी आणणे बंधनकारक राहील. त्यामुळे १०० पक्षी यशस्वीरित्या सांभाळणाऱ्या लाभार्थ्यांनी पक्ष्यांची संख्या १५० च्या वर नेल्यास सदर लाभार्थ्यास मोठ्या शेडसाठी दोनपट निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४) भू-संजीवनी नाडेप कंपोस्टींग :-**

सदर कामाचा लाभ मिळविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तीक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील.

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक १३ नुसार नरेगा अंतर्गत रुपये १०,५३७/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ४,०४६/- | (प्रमाण ३८ टक्के) |
| कुशल खर्च | - | रु. ६,४९१/- | (प्रमाण ६२ टक्के) |
| एकूण | - | रु. १०,५३७/- | (प्रमाण १०० टक्के) |

**५) ६०:४० चे प्रमाणे राखणे :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भू-संजीवनी नाडेप कंपोस्टींग हे काम वगळता उर्वरित जनावरांचा गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे कुक्कूटपालन शेड बांधणे इत्यादी कामाचे अकुशल-कुशल प्रमाण हे अनुक्रमे ८:९२, ९:९१, व १०:९० इतके आहे. सदर बाब पाहता, सदर कामांमुळे जिल्ह्यांचे ६०:४० (अकुशल-कुशल) प्रमाण राखले जाणार नाही. त्यामुळे सदरची कामे हाती घेत असताना अकुशल-कुशल प्रमाण राखण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे इतर अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत.

१) वैयक्तिक वृक्ष लागवड व संगोपन (३ वर्षे-१ हेक्टर) (कोणतेही वृक्ष किंवा विविध वृक्षांचे मिश्रण)

२) वैयक्तिक शेततळे - १५ x १५ x ३.००

३) शेत किंवा बांधांवर वृक्ष लागवड (बिहार पॅटर्न)

४) शोष खड्डे

५) कंपोस्ट बंडिंग

वरील यादी फक्त उदाहरणादाखल दिले आहे. तथापि ६०:४० चा प्रमाण राखण्यासाठी जे काही काम ग्रामपंचायत/लाभार्थ्यास आणि यंत्रणेस सुचेल ती मजुरीचे प्रमाण अधिक असलेली सर्व कामे घेता येतील. याप्रमाणे जनावरांचा गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे व कुक्कूटपालन शेड बांधणे यापैकी एक काम एका लाभार्थ्यास मंजूर करुन प्रत्येक लाभार्थी पातळीवर मग्रारोहयो अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या विविध कामांच्या संयोजनातून ६०:४० चा अकुशल कुशल प्रमाण राखण्याचा प्रयत्न करावा.

**६) प्रशिक्षण :-**

सदर योजनेमध्ये शेतकरी लखपती व्हवा यासाठी विविध योजनेच्या माध्यमातून समृध्दी साखळी निर्माण व्हावी हा उद्देश आहे. सदर योजनेतून प्रामुख्याने गुरांचा गोठा, शेळ्या किंवा मेंढयांचा गोठा, कुक्कूटपालन शेड इत्यादींचा समावेश असले तरी सोबतीला फळबाग वृक्ष लागवड, शेततळे व इतर योजनांचा समन्वय साधावयाचा आहे. यासर्व बाबींचा दृष्टीकोन विकसित होण्यासाठी प्रशिक्षणाची गरज राहिल. तसेच गुरांच्या शेण, लेंडी व विष्ठेपासून सेंद्रिय खताचे विविध प्रकार तयार करण्याचे प्रशिक्षण द्यावे लागते. जेणेकरुन सेंद्रिय शेतीसोबत पशुसंवर्धन हे पुरक व्यवसाय करुन समृध्दीकडे वाटचाल करुन लखपती होण्याचे स्वप्न साकारता येईल.

**७) इष्टांक :-**

वरील प्रकारची कामे करुन गावातील/तालुक्यातील/जिल्ह्यातील आणि राज्यातील १०० टक्के कुटूंबांना समृध्द करावयाचे आहे. या कृषी व पशुसंवर्धन विभागाची विशेष मदत लागणार आहे. अत: या विभागाने जिल्हा व तालुका प्रशासनाला स्वत: पुढाकार घेऊन मदत करावी. सुरुवातीच्या टप्प्यात प्रत्येक गावात किमान लाभार्थ्यास लखपती करुन बघावे. याचा पाठपुरावा ॲपच्या माध्यमातून करण्यात येईल.